|| श्री ||

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. २३ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ४१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


✻ सुविचार ✻
अनुभव हे ज्ञानाचे
सर्वोत्तम शिक्षक आहेत.




## SPOT NEWS

### तूर खरेदीला २८ मे पर्यंत मुदतवाढ

● **मुंबई** – राज्यातील तूर उत्पादक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेता पीपीएस अंतर्गत नाफेड आणि एनसीसीएफ यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या तूर खरेदीस आता केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने २८ मे २०२५ पर्यंत मुदत वाढवून दिली आहे. यामुळे राज्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, अशी माहिती राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. तूर उत्पादक शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेत, केंद्र सरकारने तूर खरेदी मुदत वाढवून दिल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे आभार मानले आहेत. राज्यात तूर खरेदीची मुदत १३ मे पर्यंत देण्यात आली होती. तूर उत्पादक शेतक–यांची मागणी लक्षात घेता तूर खरेदीची मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आणि पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केंद्र सरकारकडे केली होती. तसा प्रस्ताव पणन विभागाकडून केंद्रीय कृषी आणि कल्याण मंत्रालयाला पाठविण्यात आला होता. या मागणीची दखल घेत ही मुदत २८ मे २०२५ पर्यंत वाढवून देण्यात आली आहे.

### शिवराज्याभिषेक सोहळा ६ जून रोजी साजरा करू नका : भिडे गुरुजी

● **कोल्हापूर** – शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संघटनेचे अध्यक्ष संभाजी भिडे यांनी महत्वाची मागणी केली आहे. शिवराज्याभिषेक सोहळा ६ जून रोजी साजरा करू नये. त्या दिवशी साजरा करण्यात येणारा शिवराज्याभिषेक सोहळा बंद केला पाहिजे. तसेच तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा केला पाहिजे, अशी मागणी संभाजी भिडे यांनी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा ६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक पार पडला होता. त्यामुळे ६ जून रोजी शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो. तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या दिवशी येतो. त्याप्रमाणे शिवराज्याभिषक सोहळा साजरा करावा, अशी मागणी संभाजी भिडे यांनी केली. आपण अजून ब्रिटिशांच्या प्रथेप्रमाणे तारखेनुसार उत्सव साजरा करतो. हे उत्सव तिथीप्रमाणे साजरे करावे. तसेच रायगडावर असलेली वाघ्या कुत्र्यांची समाधी हटवण्यात येऊ नये, या मागणीचाही त्यांनी पुनरुच्चार केला. रायगडावर असलेले वाघ्या कुर्त्याचे शिल्प हटवण्याची मागणी छत्रपती संभाजी राजे यांनी केली होती. त्यांच्या या मागणीला संभाजी ब्रिगेडने पाठिंबा दिला होता. वाघ्या कुत्र्याचा इतिहासात कुठेच उल्लेख नाही असे संभाजी राजे यांनी म्हटले होते. त्यांच्या या मागणीला संभाजी भिडे यांनी विरोध केला होता. त्यामुळे हा वाद काही दिवसांपूर्वी चांगला रंगला होता.

## जम्मू-काश्मिरातील चकमकीत

# अकोलेच्या सुपुत्राला वीरमरण!

### ब्राम्हणवाड्याचे भूमिपुत्र जवान संदीप गायकर शहीद

● **अकोले । वीरभूमी–**

जम्मू-काश्मीरच्या किश्तवाडमधील चतरू येथील सिंगपोरा भागात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली. या चकमकीत अकोलेचे (जि. अहिल्यानगर) सुपुत्र जवान संदीप पांडुरंग गायकर यांना वीरमरण आले. गायकर यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथे उद्या (शनिवार दि. २४ रोजी) आणण्यात येणार आहे. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे.



शहिद संदीप पांडुरंग गायकर गेल्या सहा ते सात वर्षांपासून सैन्यदलाच्या मराठा बटालियनमध्ये कार्यरत होते. मात्र, २१ मे रोजी जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरोधात लढताना त्यांना वीरमरण आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या वीरमरणाची बातमी पोहोचताच ब्राम्हणवाडा गावात शोककळा पसरली. जम्मू काश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरुद्ध ऑपरेशन दरम्यान जोरदार गोळीबार सुरू आहे.

या चकमकीत एका जवानाला वीरमरण आले. ऑपरेशन अजूनही सुरू आहे असे पोस्ट व्हाईट नाईट कॉर्प्सने एक्स हँडलवरून केली. मिळालेल्या माहितीनुसार, जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड येथील जंगलात दहशतवादी असल्याची माहिती भारतीय सैनिकांना मिळाली होती. यानंतर भारतीय सैनिकांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला आहे. दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी मोहीम सुरूच आहे.

संदीप गायकर हे अत्यंत शिस्तबद्ध, कर्तव्यनिष्ठ आणि राष्ट्रप्रेमी सैनिक होते. आपल्या कर्तव्य बजावत असताना त्यांनी प्राणांची आहुती देऊन देशसेवा केली. त्यांच्या बलिदानाने संपूर्ण ब्राम्हणवाडा गाव, अकोले तालुका आणि अहिल्यानगर जिल्हा शोकसागरात बुडाला आहे. त्यांच्या शौर्याची आणि बलिदानाची आठवण कधीही विसरली जाणार नाही अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या. शनिवार दि. २४ मे रोजी ब्राम्हणवाडा हायस्कूलच्या ग्राऊंडवर त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात मुखाग्नी होणार आहे.

या वीर जवानाला ग्रामपंचायत ब्राम्हणवाडाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी सर्व ब्राम्हणवाडा ग्रामस्थ आणि समस्त अकोले तालुक्याच्यावतीने अत्यंत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## जिल्ह्यात रविवारपर्यंत पाऊस!

### हवामान विभागाचा अंदाज । नागरिकांनी सतर्कता बाळगावी

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्ह्याच्या काही भागात दि. २२ मे २०२५ रोजी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस गडागडाटासह वादळी वारा, वीज पडण्याची शक्यता तसेच २३ मे रोजी गडगडाटासह वादळी वारा, वीज पडणे तसेच मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असुन जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच २४ व २५ मे २०२५ रोजी वीजांच्या कडकडाटांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आलेला आहे. नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे. मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/ दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज्) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा. धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ११ वी प्रवेशाचे संकेतस्थळ सोमवारपासून सुरू होणार

● **मुंबई । वीरभूमी–**

राज्यातील उच्च माध्यमिक बोर्डाकडून ११ वीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा गोंधळ संपता संपेना झाला. शिक्षण संचालनालयाकडून अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी आता नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार, अकरावीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश २६ मे पासून सुरू होणार असून पहिली फेरी प्रत्यक्षात तेव्हाच सुरू होईल. त्यामुळे, गेल्या २ दिवसांपासून ऑनलाईन प्रवेशासाठी धडपड करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी ४ दिवस थांबावे लागणार आहे.

२१ मे रोजी बुधवारी प्रत्यक्षात सुरू होणारी ऑनलाइन अकरावी प्रवेशाची प्रक्रिया वेबसाईट मधील तांत्रिक अडचणीमुळे सुरू होऊ शकली नाही. त्यानंतर, आता महाराष्ट्र शिक्षण महामंडळाकडून २६ मे ही नवी तारीख देण्यात आली असून २६ मे ते ३ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश घेता येईल.

राज्य शिक्षण महामंडळाने दिलेल्या नव्या वेळापत्रकानुसार, २६ मे ते ३ जूनपर्यंत म्हणजे ९ दिवस ११ वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे. त्यानंतर, ५ जून रोजी पहिली जनरल मेरीट लिस्ट लागणार आहे. ६ ते ७ तारखेपर्यंत विद्यार्थ्यांना आपल्या हरकती नोंदवून तक्रार करता येईल. त्यानंतर, ८ जून रोजी अंतिम जनरल मेरीट लिस्ट जाहीर होईल.

राज्यात शासनाची वेबसाईट सुरू होताच अनेक विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर अडचणींचा सामना करावा लागला. त्यामुळे, आता ही प्रवेश प्रक्रियाच पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही प्रवेश प्रक्रिया सोमवारपासून म्हणजेच २६ मेपासून सुरू होणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना २६ मे ते ३ जून दरम्यान आपल्या पसंतीचे कॉलेज क्रमांक निवडता येतील, त्यासोबतच संपूर्ण अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा अर्ज भरता येणार आहे. तर, अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पहिली गुणवत्ता यादी १० जूनला जाहीर होईल, अशी माहिती महामंडळाकडून देण्यात आली आहे.




## बीडमध्ये पवनचक्कीच्या वादातून गोळीबार

● **बीड । वीरभूमी–**

बीड जिल्ह्यातून पुन्हा एकदा धक्कादायक घटना समोर आली असून पवनचक्कीच्या वादातून बीडमध्ये पुन्हा एकदा गोळीबार झाला आहे. बीड जिल्ह्यातील नेकनूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे. या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीचा अनुभव राज्यभरात आला आहे.

बीड मधील संतोष देशमुख हत्या प्रकरण अजूनही ताजे असताना पुन्हा एकदा बीडमध्ये गोळीबाराची घटना समोर आली आहे. या घटनेमध्ये एक जण गंभीर इतर जखमी झाल्याची माहिती देखील समोर आली आहे. बीड जिल्ह्यामध्ये सातत्याने होणाऱ्या अशा घटनांमुळे बीड जिल्हा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात देखील पवनचक्कीच्या वादातूनच त्यांचा खून झाला असल्याचे समोर आले होते. आता पुन्हा एकदा पवनचक्कीच्या वादातून गोळीबार झाला असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

बीडमध्ये वाढती गुन्हेगारी अतिशय गंभीर आहे. काही केल्या त्याला आळा बसत नाही. ही हेलावून टाकणारी घटना असल्याचे ठाकरे गटाच्या उपनेत्या उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. विशेषत: पवनचक्कीच्या वादातून हा प्रकार झाला असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणातून अजूनही पोलिसांनी कोणताही धडा घेतलेला नसल्याचे दिसत आहे. त्यामुळेच गुंडांची धमक वाढली असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. हे कधी थांबेल? असा प्रश्न त्यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे.

# SPOT NEWS

## आबासाहेब सोनवणे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

हिंगणगाव (ता. नगर) येथील प्रथम लोकनियुक्त सरपंच तथा सरपंच परिषदचे (मुंबई) राज्य कोअर कमिटी अध्यक्ष आबासाहेब सोनवणे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. अहिल्यादेवी फाउंडेशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान केला जाणार असल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड व कार्याध्यक्ष महादेव महानोर यांनी दिली. अहिल्यादेवी फाउंडेशन यांच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र रत्न गौरव या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा वितरणाचे आयोजन रविवारी (दि. २५ मे) रोजी सकाळी १० वाजता, निर्मिती लॉन्स, विजापूर रोड सोलापूर येथे पार पडणार आहे. या सोहळ्यात सोनवणे यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून आमदार प्रकाश (अण्णा) शेंडगे, तर प्रमुख पाहुणे म्हणून आयकर आयुक्त (पुणे) डॉ. नितीन वाघमोडे, आयकर आयुक्त (मुंबई) डॉ. सचिन मोटे, सहाय्यक पोलीस आयुक्त (पुणे) रुक्मिणीताई गलांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त राम मांडूरले, तनिष्का फाउंडेशनचे अनिल भीमराव जाहीर, मिसेस इंडिया श्वेता परदेशी, रिल स्टार प्राजक्ता मालुंजकर उपस्थित राहणार आहे.

## राष्ट्रीय अंधत्व निवारण समन्वय समितीच्या अध्यक्षपदी जालिंदर बोरुडे यांची निवड

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



राष्ट्रीय अंधत्व निवारण समन्वय समितीच्या महाराष्ट्र राज्याचे अध्यक्षपदी अहिल्यानगर येथील नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीची घोषणा समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत रानडे यांनी केली. जालिंदर बोरुडे हे गेल्या ३२ वर्षापासून अहिल्यानगरसह महाराष्ट्रात नेत्रदान चळवळ प्रभावीपणे राबवित आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांची महाराष्ट्र राज्याचे अध्यक्षपदी निवड केली असल्याची माहिती संस्थेचे सचिव यशवंत भोसले यांनी दिली. लवकरच संपूर्ण महाराष्ट्रभर या संघटनेची कार्यकारणी जाहीर करण्यात येणार असून, महाराष्ट्रात प्रभावीपणे नेत्रदान चळवळ राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी दिली. बोरुडे यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## मयताच्या वारसाला नुकसान भरपाई देण्याचे श्रीगोंदा न्यायालयाचे आदेश

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

वैशाली दिलीप सुर्वे यांना त्यांचे पती दिलीप माधव सुर्वे यांच्या अपघाती मृत्यूनंतर ५३ लाख १५ हजार रुपये नुकसान भरपाई आणि ६ टक्के व्याज मंजूर केले आहे. हा निकाल माननीय जिल्हा न्यायाधीश मुजीब. एस. शेख यांनी दि. १५ मे २०२५ रोजी जाहीर केला. दि. १ जुलै २०१८ रोजी करमाळा येथील देवीचा माळ येथे झालेल्या अपघातात दिलीप माधव सुर्वे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या अपघातानंतर त्यांच्या वारसांनी श्रीगोंदा येथील न्यायालयात नुकसान भरपाईसाठी दावा दाखल केला होता. या खटल्यात मयत दिलीप सुर्वे यांच्या वारसांतर्फे ॲड. बी. ए. नागवडे यांनी यशस्वीपणे बाजू मांडली. या निकालामुळे सुर्वे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून, न्यायालयाच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. हा निकाल अपघातग्रस्त कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

# सुरळीत वीजपुरवठ्यासाठी नागरीकांचा ठिय्या

### संगमनेर महावितरण कार्यालयाला माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांच्या नेतृत्वात दिले निवेदन

**● संगमनेर । वीरभूमी –**

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध विकासाच्या योजना राबवून अत्यंत वैभवशाली व सुरक्षित शहर म्हणून संगमनेरची राज्यात ओळख निर्माण झाली आहे. मात्र मागील काही दिवसांपासून महावितरण कार्यालयाकडून सातत्याने अनियमित, खंडित वीजपुरवठा केला जातो. यामुळे अनेक नागरिक त्रस्त झाले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांचा रोष वाढत असून तातडीने यावर उपाययोजना कराव्यात या मागणीसाठी आज नागरिकांनी एमएसईबी कार्यालयाला निवेदन दिले.



संगमनेर नगरपरिषदेच्या मा. नगराध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी सोमेश्वर दिवटे, गजेंद्र अभंग, किशोर टोकसे, नूरमोहम्मद शेख, नितीन अभंग, संतोष मुर्तडक, जावेद पठाण, सौ. सुषमा भालेराव, सौ. वैशाली बर्गे, रामदास सोनवणे, तुषार अरगडे, श्रावणी खेमनर, सौ. साळुंखे कविता, सौ. मंगल साळुंखे, जीवन पंचारिया, पूजा पावसे, सुवर्णा शिंदे, संजय कानवडे, सादिक तांबोळी, महेश सानप, लक्ष्मण बर्गे, अभय खोजे, शैलेश कलंत्री, विजय पांढरे, सौ. सोनल गांधी, सौ. नूतन गांधी, प्रमोद कडलक, मनोज कुमार यंगदाल, मयूर वैराळ यांसह नागरिक उपस्थित होते.

या निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर शहर व परिसरात अनियमित वीजपुरवठा केल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहे. अनियमित वीज पुरवठा, कमी किंवा जास्त होल्टेजची समस्या, तुटलेल्या तारा व अनेक रहदारीच्या ठिकाणी विजवाहक तारांना पडलेला झोळ, तसेच अनेक नागरिकांच्या घराजवळून गेलेल्या मेन लाईनच्या हाय व्होल्टेज लाईनच्या वीज वाहकतारांना संरक्षण कवच नसल्याने जीवित व मनुष्यहानी होण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी पोल दुरुस्तीची कामे रखडली आहे. या समस्यांमुळे सामान्य नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि उद्योजकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः शहरी व ग्रामीण भागामध्ये वीज पुरवठा वेळेवर न होणे तसेच तांत्रिक समस्या दीर्घकाळ प्रलंबित राहणी ही चिंताजनक बाब आहे. याबाबत अनेक वेळा तक्रार देऊनही वीज वितरण कंपनीकडून त्याची दखल घेतली जात नाही. याबाबत महावितरण कंपनीकडून त्वरित पाऊले उचलने गरजेचे आहे.

तरी महावितरण कार्यालयाने पुढील ८ दिवसात यासर्व समस्यांचे निराकरण करावे. संगमनेर विभागासाठी एक स्वतंत्र हेल्पलाइन नंबर २४ तास कार्यरत सुरू करावा. अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. यावेळी महावितरणचे श्री. खेमनर यांनी हे निवेदन स्वीकारले व तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

### खंडित होणारा वीजपुरवठा ही चिंतेची बाब : दुर्गाताई तांबे

■ मागील सहा महिन्यांपासून संगमनेर शहरासह ग्रामीण भागात विजेचा प्रश्न ऐरणीवर आहे. महावितरण या गोष्टीकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे मात्र दुर्दैवाने तसे होत नाही. तालुक्यात सध्या खंडीत वीजपुरवठा सुरू आहे. विचारणा केल्यास याबाबत उडवा उडवीची उत्तरे अधिकारी देत आहेत. हे अत्यंत चुकीचे आहे. यावर तातडीने मार्ग काढावा अन्यथा तालुक्यातील जनता रस्त्यावर उतरून महावितरण कार्यालया विरोधात तीव्र निषेध आंदोलन करतील, असा इशाराही सौ. दुर्गाताई तांबे यांनी दिला आहे.

## तिसगाव उपनगरातील अंतर्गत रस्त्यांची दैनावस्था




**● पाथर्डी । वीरभूमी –**

तालुक्यातील मोठी बाजारपेठचे गाव म्हणून ओळख असलेल्या तिसगाव येथील उपनगरातील रस्त्यांची मोठी दुरावस्था झाली असून रस्त्यावर चिखल पाणी साचत असल्यामुळे नागरिकांना चिखल तुडवत ये जा करावी लागत आहे. पाणीटंचाई बरोबरच तिसगाव ग्रामस्थांना आता अवकाळी पावसामुळे रस्त्याच्या झालेल्या दुरावस्थेचा देखील मोठा सामना करावा लागत आहे.

तिसगाव येथील माधवनगर, कोट परिसर, तुळजापूर परिसर या भागामध्ये मोठ्या प्रमाणात रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. बारा महिन्यात बारा वेळा देखील नळाला पाणी येत नाही. रस्ते निटनेटके नाहीत त्यामुळे मूलभूत सुविधा अभावी तिसगावच्या ग्रामस्थांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी तिसगाव मधील सर्वच प्रभागांमध्ये फेरफटका मारून रस्त्यांची झालेली दुरावस्था नजरेखालून घालावी व मुरूम टाकून तात्पुरती तरी रस्ता दुरुस्ती करावी, अशी मागणी तिसगावकरा कडून करण्यात येत आहे.

## संजीवनी इंजिनिअरींगच्या किर्लोस्कर मध्ये चार व बिझिनेस नेक्स्ट मध्ये पाच विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

**● कोपरगाव । वीरभूमी–**



या महाकाय विश्वात पालकांची सर्वात मौल्यवान संपत्ती म्हणजे त्यांची संतती. आपला पाल्य या महाकाय विश्वात स्थिर स्थावर व्हावा, स्वावलंबी व्हावा, त्याला नोकरी मिळावी, ही पालकांची माफक अपेक्षा असते. या अपेक्षेने पालक आपल्या पाल्यांना संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज मध्ये दाखल करतात. कॉलेजचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डिपार्टमेंट विविध कंपन्यांच्या संपर्कात राहुन कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करते. अशाच प्रयत्नातुन अलिकडेच किर्लोस्कर न्युमॅटिक कंपनीने चार व बिझिनेस नेक्स्ट कंपनीने पाच विद्यार्थ्यांची चांगल्या वार्षिक पॅकेजवर नोकरीसाठी निवड केली आहे. अशा प्रकारे संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने आपल्या विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवुन देण्याचा ध्यास कायम ठेवला असुन पालकांचे स्वप्न पुर्ण होत आहे, अशी माहिती महाविद्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

किर्लोस्कर न्युमॅटिक या यांत्रिकी उत्पादनाच्या क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या अंतिम वर्षातील क्रिष्णा संजय राऊत, सहर्ष उमेश गुंजाळ, ऐश्वर्या मनोज कुंभार व कार्तिक राजेंद्र पवार यांची नोकरीसाठी निवड केली. बिझिनेस नेक्स्ट या जगभरातील बॅन्का आणि वित्तिय संस्थांना सॉफ्टवेअर सपोर्ट करणाऱ्या कंपनीने अंतिम वर्षातील कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या ऋतुजा शिवाजी बेंद्रे, देवांशी लोकेश गुप्ता, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या स्वराज शशिकांत लांडे, अक्षदा सोमनाथ चव्हाण व इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या ऋषिकेश भाऊसाहेब दुबे यांची नोकरीसाठी निवड केली आहे.



निवड झालेले सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातील आहे. संजीवनीच्या प्रयत्नाने ग्रामीण विद्यार्थी नोकरदार बनत आहेत. यामुळे पालक वर्गात मोठे समाधान आहे. अनेक पालक व्यवस्थापन, डायरेक्टर व संबंधित विभाग प्रमुख आणि शिक्षकांना भेटून महाविद्यालयाच्या प्रयत्नांबध्दल आपला अभिप्राय व्यक्त करतात. संजीवनीच्या सर्वच संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी कृतिबध्द कार्यक्रम राबवितात, त्यामुळे 'संजीवनी पॅटर्न' पालकांना अधिक भावत आहे, असे पत्रकात शेवटी म्हटले आहे.

संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## चांदेकसारे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या जागेसाठी जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी : आ.आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी –**



कोपरगाव मतदार संघातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गामुळे चांदेकसारे गावातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची जागा संपादित करण्यात आली होती. त्यामुळे चांदेकसारे, घारी, डाऊच बु., डाऊच खु., सोनेवाडी आदी गावातील नागरीकांना आरोग्य सेवा देणाऱ्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला पर्यायी जागा उपलब्ध व्हावी यासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या पर्यायी जागेसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.

नागपूर-मुंबईचा लांब पल्ल्याचा प्रवास कमी करून प्रवासी व वाहनधारकांचा प्रवास जलदगतीने व्हावा यासाठी निर्माण करण्यात आलेल्या नागपूर-मुंबई राष्ट्रीय समृद्धी महार्गासाठी कोपरगाव मतदार संघातील अनेक गावातील जमीनी मोठ्या प्रमाणात संपादित करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये चांदेकसारे येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची जागा देखील संपादित करण्यात आली होती. त्यामुळे सदरच्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची इमारत पाडण्यात येवून एम.एस.आर.डी.सी. पर्यायी जागेत प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची नवीन ईमारत बांधून देणार होते. परंतु जागा उपलब्ध न होऊ शकल्यामुळे नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचा प्रश्न रखडला होता. त्यामुळे चांदेकसारेच्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला पर्यायी जागा मिळावी यासाठी आ.आशुतोष काळेंचा शासनदरबारी पाठपुरावा सुरु होता.

त्या पाठपुराव्याची दखल घेवून चांदेकसारेच्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला पर्यायी जागा देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून सर्व सुविधांयुक्त प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न आ. आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यातून सुटला आहे. त्याबद्दल चांदेकसारे, घारी, डाऊच बु., डाऊच खु., सोनेवाडी आदी गावातील नागरीकांनी आ. आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

## चांगल्या संस्काराने समाजामध्ये अनिष्ट विचार रुजणार नाहीत

### नवनाथ महाराज वारंगुळे । तोंडोळी येथे मोफत बालसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**● पाथर्डी । प्रतिनिधी–**



बालवयात मनावर झालेले संस्कार आयुष्यभर पुरतात मोबाईल सोशल मीडिया व भोगवादाच्या जमान्यात मुलांवर सेवाभाव धार्मिकता व कष्ट करण्यासाठी पुढे येण्याची वृत्ती असे संस्कार रुजवल्यास समाजामध्ये अनिष्ट विचार रुजणार नाहीत, असे मत नवनाथ महाराज वारंगुळे यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील तोंडोळी येथे पंधरा दिवसीय मोफत बालसंस्कार शिबिराचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्रवीण महाराज कोरडगावकर यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या शिबिरासाठी नवनाथ महाराज राऊत, महेश महाराज मोरे, कार्तिक महाराज गोरे, उद्धव वारंगुळे आधी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना गायन, वादन, पखवाज वादन, टाळ, तबला आदींबाबत संत महंतांकडून शिक्षण दिले जाणार आहे. यावेळी बोलताना वारंगुळे महाराज म्हणाले, वारकरी संप्रदाय धर्म, साधना, सेवाभाव व त्याग भावनेच्या बळावर समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निस्वार्थ भावनेने झटत आहे. जीवनाचे अंतिम कल्याण साधण्यासाठी सुरू असलेली अशी उपासना पद्धती आता वैश्विक पातळीवर जाऊन पोहोचले आहे. गावागावात सायंकाळी हरिपाठ होतात. भजन कीर्तन पूजन असे कार्यक्रम होतात. यासाठी जेष्ठ स्त्री-पुरुषांचा सहभाग असतो. पुढील पिढ्यांनाही सांप्रदायिक शिक्षण मिळावे, त्या माध्यमातून समाजाचे कल्याण, आत्मकल्याण व धर्म विचाराची जाण असणारी नवी पिढी राष्ट्राला बलशाली करणारी ठरणार आहे. यासाठी मुलांना वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत दिलेले शिक्षण किंवा त्यांनी घेतलेले शिक्षण याचाच आयुष्यावर खरा प्रभाव ठरतो. यासाठी पालकांनी मुलांच्या मानसिक, बौद्धिक भावनिक व शारीरिक विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. येणारा काळ समाज व धर्मासाठी अत्यंत प्रतिकूल असून धर्म विचारांनी प्रेरित झालेले सेवक यांच्याकडूनच समाजाला खरा आधार मिळू शकतो. यासाठी अशा शिबिरांचे आयोजन गाव पातळीवरील संत महंतांकडून होणे आवश्यक आहे. असे वारंगुळे महाराज म्हणाले. तोंडोळीचे भूमिपुत्र गणेश काका सारडा, रमेश काका लोहिया, रामेश्वर लोहिया, सत्यनारायण सारडा, रामभाऊ सारडा, नंदू भाऊ लोहिया, भाऊसाहेब काकडे, बबनराव भराट, राजेंद्र वारंगुळे, सुनील भराट, सरपंच नंदू वारंगुळे, महेश देशमुख आदींचे सहकार्य लाभत आहे.

SPOT NEWS

## खुली जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन

**● अहिल्यानगर I वीरभूमी–**
अहिल्यानगर जिल्हा थलेटिक्स असोसिएशनच्या वतीने १६ वर्षांवरील पुरुष व महिला खुल्या गटातील मैदानी थलेटिक्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन दि. १ जून रोजी सकाळी ८ वाजता लोणी येथील पी. व्ही. पाटील (सिनियर) महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील सर्व खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असून, ही स्पर्धा फक्त जिल्ह्यातील खेळाडूंसाठी मर्यादित आहे. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विजेते खेळाडू गुणवत्ता प्रमाणपत्राच्या मानकरी ठरणार आहेत. याशिवाय, या गुणवंत खेळाडूंची पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे. राज्यस्तरीय स्पर्धा २१ ते २२ जून दरम्यान पुणे किंवा मुंबई येथे आयोजित केली जाणार आहे. राज्य गुणवत्ता प्रमाणपत्र ५% नोकरी राखीव कोट्यात उपयोगी ठरणार आहे. तसेच, राज्य व जिल्हा स्तरावरील सहभाग प्रमाणपत्र लष्कर भरती प्रक्रियेसाठी पात्र ठरणार आहे. प्रवेश अर्ज ऑफलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार असून, स्पर्धेच्या दिवशी सकाळी ८ वाजेपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. सर्व खेळाडूंनी ओरिजिनल आधार कार्ड अनिवार्यपणे सोबत आणावे. भालाफेक व हातोडाफेक या प्रकारात सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी स्वतःचा भाला व हातोडा बरोबर आणणे बंधनकारक आहे.

## नवीन जोडप्याच्या हस्ते ११ झाडांचे वृक्षारोपण

**● अहिल्यानगर I वीरभूमी –**
जय हिंद फाउंडेशनच्या वतीने एक अभिनव उपक्रम राबवत निर्मलनगर येथे विवाहानिमित्त ११ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. वैभव संजय आव्हाड आणि निकिता यांचा विवाह सोहळा नुकताच पार पडला. या सोहळ्याला केवळ पारंपरिक स्वरूप न देता पर्यावरण संवर्धनाची जोड देत, आंबा, आवळा, लिंब अशा ११ झाडांचे वृक्षारोपण या नवविवाहित जोडप्याच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमात परिसरातील अनेक मान्यवर आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, बबनराव पालवे, जगन्नाथ जावळे, दिनकर गिते, ज्ञानदेव चेमटे, संजय सानप, सुरेश दहिफळे, बाबासाहेब आव्हाड, मोहनराव आव्हाड, अश्रुबा पालवे, अर्जुन बडे, बळवंतराव पालवे, निवृत्त पोलीस अधिकारी श्याम जावळे, हरिश्चंद्र बडे, पप्पू गिते, राजेंद्र शेकडे, जय भगवान महासंघाचे संजय आव्हाड, सुमित डमाळ, ज्ञानेश्वर बडे, भारती डमाळ, ओंकार काकडे, पूनम खेडकर, शितल बुधवंत, आशा आव्हाड, रंजना बडे, पूजा दहिफळे आदी उपस्थित होते. विवाह सोहळ्यासारख्या आनंदाच्या प्रसंगी झाडे लावून तो दिवस संस्मरणीय बनवण्याचा संदेश या उपक्रमातून दिला गेला. जय हिंद फाउंडेशनने राबवलेल्या या उपक्रमाचा आदर्श घेऊन जिल्ह्यातील प्रत्येक गावात नवविवाहित जोडप्यांच्या हस्ते झाडे लावण्यात यावीत, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# भारतीय सैनिकांच्या सन्मानासाठी अकोलेत तिरंगा रॅली

### माजी आ. वैभवराव पिचड यांच्या नेतृत्वात रॅली I भारत जिंदाबादच्या घोषणांनी चैतन्यमय वातावरण

**● अकोले I वीरभूमी–**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर यशस्वी केल्याबद्दल व सैन्यदलाने केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी व त्यांना पाठींबा देण्यासाठी अकोलेत भाजपचे अनुसूचित जन जाती मोर्चाचे राष्ट्रीय मंत्री तथा माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या नेतृत्वात भाजपाकडुन भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली होती.

भारताने कुंकुवाचा बदला ऑपरेशन सिंदुरच्या रुपाने घेतला, त्यांचे मनोबल वाढण्यासाठी व सैन्याला पाठिंबा देण्यासाठी व आम्ही सर्व भारतीय एक आहोत हे दाखविण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आल्याचे प्रतिपादन वैभवराव पिचड यांनी केले.



यावेळी शालेय विद्यार्थी, पोलीस भरती ॲकडेमीचे विद्यार्थी, मॉडर्न हायस्कूलचे विद्यार्थी, माजी सैनिक, प्राध्यापक, शिक्षक, महिला व नागरिकांचा उत्स्फूर्त विशेष सहभाग, भारत झिंदाबाद तर पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा यामुळे शहरात चैत्यन्याचे वातावरण निर्माण झालेले दिसून आले.

भारतीय लष्कराच्या पाकिस्तान विरुद्धच्या यशस्वी ऑपरेशन सिंदूर कारवाई समर्थनार्थ राष्ट्र प्रेमींनी काढलेल्या अकोले शहरातील तिरंगा यात्रेत राष्ट्र घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

ही तिरंगा यात्रा यशस्वी करण्यासाठी माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदशनाखाली ज्येष्ठ नेते सीताराम भांगरे, भाजपचे अकोले मंडळ अध्यक्ष राहुल देशमुख, कोतुळ गट अध्यक्ष बाळासाहेब सावंत, देवठाण मंडळ अध्यक्ष वाल्मिक नवले, बोटा मंडळ अध्यक्ष संतोष शेळके, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर, माजी भाजप तालुकाध्यक्ष यशवंतराव आभाळे, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष शरद नवले, माजी नगराध्यक्षा सौ. सोनाली नाईकवाडी, प्रा. दीपक जोंधळे, बापू टेके, राहुल ढोक, साहिल साळुंखे, राजेंद्र डावरे, गणेश धुमाळ, सागर चौधरी, सौ. शीतल वैद्य, सौ. प्रतिभा मनकर, सौ. वैष्णवी धुमाळ, तमन्ना शेख, सौ. अश्विनी धुमाळ, परशराम शेळके, तुषार सुरपुरीया, अशोक आवारी, शिवाजी आरज, प्रा. सलीम शेख, मोसीन शेख, नवनाथ मोहिते, डॉ.धनंजय वैद्य, नाजीम शेख, विशाल दारोळे, सूरज कानवडे आदी सहभागी झाले होते.

## चिचोंडीच्या उपसरपंचपदी संदीप गरुड बिनविरोध



**● पाथर्डी I वीरभूमी–**
तालुक्यातील चिचोंडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संदीप विलास गरुड यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. गुरुवारी सकाळी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सरपंच श्रीकांत आटकर यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली.


गेल्या ३० वर्षापासून मिरी–तिसगाव नळ योजनेचे अध्यक्ष एकनाथ आटकर यांच्याकडे चिचोंडी ग्रामपंचायतीची एक हाती सत्ता आहे. गावात केलेल्या विकास कामाच्या जोरावर आटकर यांनी ग्रामपंचायतीची सत्ता राखून ठेवली असून सरपंच, उपसरपंच पदासह सर्व ग्रामपंचायत सदस्य आटकर गटाचे असल्यामुळे इमरान शेख यांनी राजीनामा दिल्यानंतर उपसरपंच पदाची संधी कोणाला मिळणार याची चर्चा सुरू असताना संदीप गरुड यांचे उपसरपंच पदासाठी नाव श्रेष्ठीकडून पुढे आले.

## श्रीगोंदा पोलिसांकडून सायबर फसवणुकीचा पर्दाफास

### तक्रारदाराला परत मिळवून दिले ९२ हजार १७४ रुपये

**● श्रीगोंदा I वीरभूमी–**
श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी कोठार येथील रहिवासी सुभाष दत्तात्रय कोठारे (वय ३६, व्यवसाय ड्रायव्हर) यांच्या बँक खात्यातून सायबर फसवणुकीद्वारे ९८,९०० रुपये लंपास झाल्याच्या तक्रारीवर श्रीगोंदा पोलिसांनी यशस्वी तपास करून त्यापैकी ९२,१७४ रुपये परत मिळवून दिले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी पहाटे २:४० ते २:४२ या वेळेत कोठारे यांच्या बँक ऑफ इंडिया खात्यातून MOBIKWICK ॲप्लिकेशन आणि युपीआय पेमेंटद्वारे टप्प्याटप्प्याने ४८,९००, ४५,००० आणि ५,००० रुपये असे एकूण ९८,९०० रुपये वजा झाले होते. याबाबत कोठारे यांनी अहमदनगर सायबर पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केली होती. ही तक्रार पुढील तपासासाठी श्रीगोंदा पोलिस ठाण्याकडे वर्ग करण्यात आली.



पोलिस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलिस अधिकारी (कर्जत) विवेकानंद वाखारे व श्रीगोंदा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉन्स्टेबल राहुल कारभारी शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तपास सुरू केला. यात पोलिस कॉन्स्टेबल अरुण पवार, महादेव जाधव, महिला पोलिस कॉन्स्टेबल अस्मिता शेळके आणि सायबर पोलिस स्टेशनच्या महिला पोलिस कॉन्स्टेबल दिपाली घोडके यांनी सहभाग घेतला. पथकाने अर्जदार कोठारे यांच्याकडून सविस्तर माहिती घेऊन, उपलब्ध सायबर साधनांचा वापर करून आणि सायबर पोलिसांच्या सहकार्याने बारकाईने तपास केला. तपासादरम्यान, फसवणुकीद्वारे वजा झालेली रक्कम केरळमधील कन्नूर जिल्ह्यातील अलाकोडे येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत होल्ड असल्याचे समजले. पथकाने या शाखेशी सातत्याने संपर्क आणि पत्रव्यवहार करून रक्कम परत मिळवण्यासाठी प्रयत्न केले. अखेर दि. ११ मे २०२५ रोजी ९२,१७४ रुपये कोठारे यांच्या बँक ऑफ इंडिया खात्यात जमा करण्यात यश मिळाले.

या यशस्वी तपासामुळे अर्जदार सुभाष कोठारे यांना मोठा दिलासा मिळाला असून, श्रीगोंदा पोलिस आणि सायबर पोलिस पथकाच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे. अनेक नागरिकांच्या फसवणुकीबाबत अज्ञात लिंक, ॲप्लिकेशन यावर क्लिक करू नका. फसवणूक झाली तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या टोल फ्री नंबर व पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन श्रीगोंदा पोलिसांनी केले आहे.

## पिंपळगाव पिसा येथील भूमिहीन आदिवासी पारधी समाजाच्या घरे पाडण्याची टांगती तलवार

**● नगर I वीरभूमी–**
श्रीगोंदा तालुक्यातील पिंपळगाव पिसा (शेंडगे वस्ती) येथे गट नंबर ८४ मधील शासकीय गायरान जमिनीवर मागील तीन पिढ्यांपासून राहत असलेल्या भूमिहीन आदिवासी पारधी समाजाच्या कुटुंबीयांना ग्रामपंचायतीकडून घरे पाडण्याच्या नोटीसा देण्यात आल्याने परिसरात तीव्र संतापाचे वातावरण आहे. भर पावसाळ्यात अशा प्रकारे घरांवर कारवाई करण्यासंदर्भात पीडित कुटुंबीयांनी तीव्र नाराजी व्यक्त करुन, प्रशासनाकडे तात्काळ कारवाईला स्थगिती देण्याची मागणी केली आहे.

याबाबत पीडित कुटुंबीयांच्या वतीने प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. आदिवासी पारधी कुटुंबीयांच्या मागणीला बहुजन समाज पार्टीच्या वतीने पाठिंबा देण्यात आला आहे. यावेळी यावेळी सुमन भोसले, सुवर्णा भोसले, रवी पवार, गोपीनाथ भोसले, कार्तिक भोसले, बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी सुनील ओहळ, जिल्हा उपाध्यक्ष



शहानवाज शेख, माजी जिल्हाध्यक्ष उमाशंकर यादव, विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब काते, जिल्हा महासचिव राजू शिंदे, योगेश खेंडके आदी उपस्थित होते.

या निवेदनाद्वारे त्यांनी पर्यायी जागा उपलब्ध करून त्या ठिकाणी घरे बांधून द्यावीत, अशी मागणी केली आहे. अन्यथा आम्हाला राहण्यासाठी दुसरे ठिकाण नसल्याने आणि सध्याच्या पावसाळी परिस्थितीत लेकराबाळांना घेऊन घर सोडणे अशक्य असल्याने जबरदस्तीने कारवाई झाली तर आत्महत्येशिवाय पर्याय उरणार नसल्याचे भावनिक आवाहन केले आहे.

ग्रामपंचायतीने केवळ आदिवासी पारधी समाजाच्या कुटुंबांना जागा खाली करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्याच गटांमध्ये इतर समाजाची घरे असताना केवळ पारधी समाजावरच ही कारवाई होणे अन्यायकारक असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. त्यामुळे ही कारवाई पक्षपाती असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शासनाने या कारवाईला स्थगिती न दिल्यास व पर्यायी जागा उपलब्ध करून दिली नाही, तर २७ मे पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कुटुंबीयांसह बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा पीडित कुटुंबीयांसह बसपाच्या वतीने देण्यात आला आहे.

## लक्ष्मीनगरच्या शासकीय जागेतील नागरीकांना उतारे देण्यासाठी महसूल विभागाकडे तातडीने प्रस्ताव पाठवा

### विरेन बोरावके यांची कोपरगाव नगर पालिकेकडे मागणी

**● कोपरगाव I वीरभूमी–**
शहराच्या लक्ष्मीनगर भागातील शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरीकांना त्यांच्या जागा शासकीय नियमाप्रमाणे नियमाकुल करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करण्यात येवून आ. आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यातून शासनाच्या आवश्यक असणाऱ्या सर्व विभागांची मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे हे प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी तातडीने महसूल विभागाकडे पाठवावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी गटनेते विरेन बोरावके यांनी कोपरगाव नगरपरिषदेकडे दिलेल्या लेखी पत्राद्वारे केली आहे.

कोपरगाव शहरात लक्ष्मीनगर परिसरात मागील अनेक वर्षापासून शासकीय जागेवर अनेक कुटुंब वास्तव्य करीत आहे. ज्या शासकीय जागेवर हे कुटुंब राहत आहेत त्यांना त्यांच्या जागा शासन नियमानुसार



नियमाकुल करून त्यांना त्यांच्या नावचे उतारे मिळावे हा प्रश्न मागील काही वर्षापासून प्रलंबित होता. या नागरिकांच्या जागा शासन नियमानुसार नियमित करण्यासाठी आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवकांनी सातत्याने कोपरगाव नगरपरिषदेकडे पाठपुरावा करून वेळोवेळी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. शासकीय जागेवर राहत असलेल्या नागरिकांच्या अडचणीची दखल घेऊन आ. आशुतोष काळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी कमिटीची बैठक घेऊन लक्ष्मीनगर मधील शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरीकांना त्यांच्या जागा शासकीय नियमाप्रमाणे नियमित करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून हे प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठविण्याच्या सूचना कोपरगाव नगरपरिषदेला केल्या होत्या. त्या सुचनेनुसार कोपरगाव नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी सर्व्हे करून, अतिक्रमित जागेची माहिती घेवून हे सर्व प्रस्ताव शासनाच्या विविध विभागाकडे मंजुरीसाठी पाठवीले होते.

या प्रस्तावांना आवश्यक असणाऱ्या सर्वच विभागांची मंजुरी नुकतीच मिळाली असून हे प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी महसूल विभागाकडे पाठविले जावून त्यानंतर शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरीकांना त्यांच्या जागेचे उतारे मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यासाठी कोपरगाव नगरपरिषदेने हे प्रस्ताव तातडीने पुढील कार्यवाहीसाठी महसूल विभागाकडे पाठवावे अशी मागणी विरेन बोरावके यांनी केली आहे. याबाबत आ.आशुतोष काळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी कमिटीची बैठक घेतली. जिल्हाधिकारी कार्यालय, नगररचना, मूल्यनिर्धारण विभागाकडे पाठपुरावा केला. त्या पाठपुराव्यातून या नागरिकांना उतारे मिळणार होते परंतु काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे पुणे नगररचना संचालक, अविनाश पाटील यांच्याकडून त्यांनी सूट मिळविली. अशा आ. आशुतोष काळे यांच्या अथक पाठपुराव्यातून मागील काही वर्षापासून प्रलंबित असलेला हा प्रश्न लवकरच सुटून शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरीकांना त्यांच्या जागेचे उतारे मिळणार असल्यामुळे या नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

